**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Issue 36 XI Vol I May. 2021 | | Impact Factor : 7.139

# भारतीय लोकशाही आणि धार्मिक साम्प्रदायीकता एक अभ्यास

डॉ. डोंगरे एल.बी.
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख), हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड

..............................................................................................................................

२१ व्या शतकातील लोकशाही समोर सर्वात मोठी समस्या म्हणजे धार्मिक द्वेष–संघर्ष होय, स्वार्थाने प्रेरित झालेले नेतृत्व जनतेच्या धार्मीक भावनेचा अनुचित मार्गाने उपयोग करून शासनाची सत्ता हस्तगत करतो. हि गोध्रा प्राप्त करण्यासाठी देशातील शांतता–विकास, राष्ट्रीय हित बाजुला करून धार्मिक हिंसात्मक संघर्षाला प्रोत्साहीत करून दंगली युध्द तसेच मोठी हिंसा घडवून आनतो. १९५० मध्ये दिल्ली, कलकत्ता, अलिगढ, पिलाभित, मुंबई येथे जातिय दंगली घडुन आल्या होत्या स्वातं¡यानंतर सर्वात मोठी दंगल १९६९ वर्षी अहमदाबाद मध्ये झाली. गाईची हत्या करण्यावरून ही दंगल होती. १९७० भिवंडी दंगल, १९७१ जमशेदपुर १९८२ बडोदा दंगल, १९८७ इंदिरा गांधी खालिस्तान पंजाब दंगल, १९९२–९३ गुजरात–मुंबई दंगल १९८६ गुजरात गोध्रा येथे तीन वेळा हिसांचराच्या घटना २००२ गोध्रा येथे मोठी हिंसात्मक दंगल या धार्मीक दंगलींचा विचार केल्यास भारतीय लोकशाही–एकात्मतेसामोर सर्वात मोठे आव्हान सांम्प्रदायिक मुलतत्ववादाचे दिसून येते. केवळ भारतीय लोकशाहीचे नव्हे तर जगातिल विविध देशानां देखील धार्मीक–वांशीक भेदभावामुळे मोठया हिंसात्मक घटना घडून आलेल्या दिसून येतात.

जागतिक इतिहासाला ज्या प्रमाणे धर्माने प्रभावीत केले त्या प्रमाणे भारतीय इतिहास देखील धर्माने मोठया प्रमाणात प्रभावीत झाल्याचेदिसून येते. भारतीय लोकशाही समोर धार्मिक संघर्ष हि एक मोठी समस्या बनलेली दिसून येते. सांम्प्रदायीकता शतकातील सर्वात मोठी समस्या बनलेली आहे.

**संविधान सभेने दोन वर्ष अकरा महिने व सतरा दिवसात संविधान तयार करून ते२६ जाने. १९५० पासून अंमलात आणले. स्वातं¡य, समता, न्याय, बंधुतेवर आधारलेले हे संविधान पूर्नतः धर्मनिरपेक्ष ठेवण्यात आले आहे. त्यामुळे कायद्या पुढे सर्व समान हे तत्व स्वीकारण्यात आले. परंतु प्रत्यंक्षामध्ये अनेक समुह आपल्या अंतर्गत उदिष्ठासाठी आपापसा मध्ये सातत्याने संघर्ष करित असल्याचे दिसून येते. येथील राजकारण ही जाती,धर्म, भाषा पंथाच्या नावाने प्रभावित आहे. आपल्या राजकिय उदिष्टांसाठी संघटीतपणे हिंसात्मक मार्गाने समाजात भिती निर्माण केली जाते त्यालाही दहशतवाद असे म्हणतात'' (भारतीय समाज विज्ञान कोष)**

तसेच अनेक विश्वंसक संघटना ज्या राजकिय, सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आहेत. या संघटना आपले उदिष्ट साध्य करण्यासाठी संविधानात्क मार्गा ऐवजी असांविधानात्क मार्गाचा अवलंब करतात. या बाबत शेरिफ बसाओ असे म्हणतात कि, **एखादया विशिष्ठ दाव्याचा अगर गा · हाण्याला प्रचार करण्याकरिता सर्वसामान्य जनात किंवा त्यातील कांही महत्वाच्या किंवा समूहात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेल्या प्रयत्नाला दहशतवाद म्हणता येईल'' (डायमंड सामाजिक विज्ञान कोष)**

याचा विचार केल्यास खलीस्तान रामजन्मभुमी, बाबरी मस्जिद, मुसलीम दहशतवादी संघठानांचे हिंसक हल्ले याचा उल्लेख करावा लागेले. १९८०च्या दशकात धार्मीक मुल्तत्ववादी



©Shaurya Publication, Latur | www.rjorunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com

चळवळीतून अनेक दहशवादी संघटनांचा उदय झालेला दिसून येतो. ''**जेहादी संघटनाच्या प्रसाराची व प्रचाराची प्रक्रिया गतिमान होण्यासाठी सन १९७९ ची इराणमधीले धार्मिक क्रान्ती प्रामुख्याने कारणीभुत ठरली**''(देवळानकर शैलेंद्र, १४०)

प्रस्तुत शोध निबधात भारतीय लोकशाही समोर धार्मिक हिंसात्मक संघर्षाची समस्या यावर एकंदरीत प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या मध्ये धर्म तत्वज्ञान मुळात चांगले आहे. ती मानवी जीवनाची मुल्य आहेत. या मुल्यांचा आधार घेऊन सामान्य जनतेच्या भावना भडकविल्या जातात त्यांना हिंसा करण्यास प्रवृत्त केले जाते या मुळे देशाच्या विकासात मोठा अडथळा निर्माण होतो या एकूण स्थीतीचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**समस्यासूत्रना :—** ''भारतीय लोकशाही समोरिल धार्मीक संघर्षाची समस्या'' संशोध निबंधाचा विषय म्हणून निवडलेला आहे.

**तथ्य संकलन पध्दती:—** प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्यसंकलना साठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आह. त्यासाठी इंटरनेट माध्यमातून उपलब्ध माहीती विविध पुस्तके, मासीके,संदर्भग्रंथ इ.वापर केलेला आहे.

**संशोधन उद्देश :—** १) जनतेच्या धार्मीक भावना आणि राष्ट्रीय एकात्मता याचा अभ्यास करणे.

२) धार्मीक राजकारणा वरून होणा·या सांस्कृतिक संघर्षाचा शोध घेने.

३) भारतीय राजकारणात धर्माची भुमिका महत्वाची आहे.

४) राष्ट्रहिता पेक्षा धर्महीत श्रेष्ठ आहे का याचा शोध घेणे.

५) भारतीय लोकशाही समोर धार्मीक मुलतत्ववाद एक समस्या बनली आहे का? याचा शोध घेणे.

**शोधनिबांधाची गृहीतकृत्य:—**१) धार्मीक स्वातं¡य आवश्यक आहे पण त्याचा उचित वापर होने आवश्यक आहे. नाही तर भारतीय लोकशाहीस घातक ठरेल.

२) धार्मीक भावनाना चुकीची उत्तेजना दिल्याने सांस्कृतिक संघर्ष होताना दिसून येतात. त्यामुळे राष्ट्र हितास घातक ठरत आहे.

३) भारतीय लोकशाहीस घातक धार्मीक अनैतिक राजकारण घातक ठरत आहे.

४) विश्व समुदाय या हिंसात्मक संघर्षाने प्रभावीत झाला आहे.

**संशोधनाचे महत्व :—**धर्म हा भारतीय राजकारणाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. धर्माला चुकीच्या स्वार्थासाठी वापर केल्याने देशातील लोकशही शासन व्यवस्थेस घातक आहे. धर्माच्या सकारात्मक उपयोगाने देशाचे कल्यान होईल. राष्ट्रहित साध्य केल्या जाऊ शकते हे संशोधन निबंधाचे महत्व आहे.

**धर्माचा अर्थ :—**धर्म हा शब्द 'धृ' या पासून बनला आहे. या शब्दाचा अर्थ धारण करणे असा होता. व्यक्ति व समाजाची धारणा करणे म्हणजे समाज व्यवस्थेवर नियंत्रन करणे, सर्व वाईट घटकापासून दुर राहने असा होतो.

''सामाजिक संरचना सुव्यवस्थीत—योग्य करणारी उत्साही प्रेरणा म्हणजे धर्म होय. धर्म म्हणजे जनतेच्या एकतेचे प्रतिक असते. धर्म म्हणजे—सत्य होय. प्रत्येक नागरिकानी आपली जबाबदारी नैतिकतेने पार पाडणे कोणतेही अनैतिक कार्य करू नये असे, धर्माचा अर्थ होतो. धर्म म्हणजे समाजात समन्वय, सहकार्य आनंद, उत्साह, एकात्मता, अखंडता, राष्ट्र हित मानवी कल्यान हिसेंला विरोध इ. कार्य धर्म करतो याचा अर्थ ते एक मानवजातीच्या कल्यानाचे शास्त्र

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Half Yearly
Issue 36 XI Vol I May. 2021
Peer Reviewed
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

आहे. थोडक्यात पावि¡याच्या भुमिकेतून श्रध्दा,—विश्वास, व्यवहार, मुल्य या आधारावर कार्यरत असलेल्या समाज व्यवस्थेच्या संकल्पनेला धर्म असे म्हणतात. भारतात धार्मीक सहिष्णुतेतून एकता म्हणजे 'विविधतेतून एकता' दिसून येते.

**भारतीय राजकारणात धर्माची भुमिका:—**

**१) धर्मरिपेक्षता:—**१९७६ साली झालेल्या ४२ व्या घटना दुरूस्तीने भारतीय घटनेच्या सरनाम्यात धर्मातीत या शब्दाचा उल्लेख केलला आहे. भारत हे राष्ट्र धर्माधिष्ठीत राज्य नाही ते धर्म बाहय राज्य नाही. ते धर्मनिरपेक्ष राज्य आहे. धर्मरिपेक्षता हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे. भारत हे विविध धर्मपंथाच्या लोकांचे माहेर घर आहे. असे म्हटल्या जाते ते योग्य वाटते भारा धर्मनिरेक्ष समाज अभिप्रत आहे.

**२) सामाजिक सरंचना:—**समाजात स्वत: धर्माबदल श्रेष्ठ भावना तर दुस•या बदल कनिष्ठतेच्या भावना ठेवने सांस्कृतिक संघर्षाचे कारण आहे. भारतात हिन्दु, मुस्लीम, ख्रीश्चन, पारसी, बौध्द, जैन, ज्यु या विभिन्न धर्माचे लोक राहतात. परंतु या भिन्न धर्मीया मध्ये संहिष्णुतेची आणि समन्वयाची भावना दिसून येत नाही त्यानुसार येथील सामाजीक संरचना बनलेली आहे. जी भारतीय लोकशाही व्यवस्थेस घातक ठरलेली आहे.

**सांम्प्रदायिकता:—**भारतीय स्वातं¡य आदोलन काळातील इतिहासाकडे एक नजर टाकली असता असे दिसून येते कि, १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणी पासून भारतात धर्म संप्रदायाचे बिजारोपन केले. १९०९ चा मोलै मिन्टो सुधारणा कायदा—मुस्लीम धर्मास सर्वप्रथम आरक्षण जाहीर केले. १९१९ ला मॉन्टेग्यु चेम्सफोर्ड कायदा— पुणे करार म. गांधी—डॉ. बाबासाहेब आंबेडकर— १९३२—१९३५ चा भारत सुधारणा कायदा केला या मुळे हिन्दु—मुस्लीम धार्मीक द्वेषाचे राजकारण देशात होऊन भारत—पाक अशी धर्मावर आधारीत दोन देशाची निर्मीती झाली.

**राजकिय पक्ष :—**भारतीय राजकारणात विकासाच्या आधारावर पक्षनिर्मीती झालेली नाही तर धर्माच्या आधारावर झालेली दिसून येते. हे राष्ट्रीय एकात्मतेला घातक ठरते. हिन्दु विश्व परिषद, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ अकाली दल, शिवसेना, जमात ए— इस्लामBJPपारसी संघटन, AIMIM मुस्लीम लिग, कॉग्रेस, समाजवादी पार्टी, बहुजन समाज पक्ष, अण्णाDMK, DMK, द्रमुक मुन्नेत्र कळधम, असे विविध पक्ष धर्मावर आधारित निर्माण झालेली दिसून येतात. विविध हे दबावगट आहे. समुह हित साध्य करण्यासाठी हिंसात्मक कारवाया केल्याचा इतिहास आहे.

**पंथनिरपेक्षता :—**देशातील राजकारण हे पंथ निरपेक्ष असावे. देशाचा प्रमुख हा कोणत्याही धर्म, पंध, जातीवर, आधारित नसावा. सर्वधर्म समभाव हे भारतीय राज्यघटने चे मुल्य आहे. राष्ट्रपतीची निवड हि पंथनिरपेक्ष पध्दतीने करण्यात येते. तरी देखील धर्माला प्रभाव हा कार्यकारी मंडळावर होत असतो. राजकारणाला धर्म प्रभावीत करतात शासनाने निर्णय धोरण कायदे हे धर्मने प्रभावीत होताना दिसून येतात हे लोकशाही चे अपयश आहे.

**धर्माचा भारतीय लोकशाहीवर प्रभाव :—**

१) भारतीय शासन व्यवस्थेत धर्माचा एवढा प्रभाव आहे कि धार्मीक प्रभावाचा विचार करून मंत्रीमंडळाची निर्मीती करण्यात येते.

२) निवडणुकी मध्ये मोठया प्रमाणात जनतेच्या धार्मीक भावनांचा विचार करण्यात येतो त्या नुसार जनतेच्या धार्मीक भावनेचा लाभ घेतल्या जातो. दुस·या धर्मा विषयी द्वेषभावना भडकाविल्या जातात.

३) धार्मीक क्षेत्रानुसार निवडणुकीच्या प्रचार व प्रसार करण्यात येतो.

४) निवडणुकीत आपला राजकिय पक्ष बहुमताने निवडुन यावा या करिता दबाव गटांचा आधार घेतल्या जातो. आपल्या हिताला अनुसरून दबावगट राजकिय पक्षाला पाठिंबा देतात. जसे— जमात—ए—इस्लाम, विश्वहिन्दु परिषद, खालसा इतर R.S.S.इत्यादी

५) वोट बॅक हि भारतीय राजकारणाला प्रभावीत करते. ज्या धर्माची लोकसंख्या अधिक आहे. त्या धर्माचे मतदान अधिक असते त्या धर्माच्या हिताला अनुसरून राजकिय पक्ष आपले धोरण आखतो.

६) धर्मीक राजकारण हे निवडनुका जिंकल्याचे महत्वाचे साधन बनलेली आहे. धार्मीक भावनांना खत—पाणी घातले कि निवडणुकात बहुमताने निवडुन येण्याचा मार्ग मोकळा होतो.

७) निवडणुका जिंकण्यचा एक मार्ग धर्माच्या तत्वज्ञानाचा प्रचार करणे मोठया संख्येने धर्मातरण घडवुन आनने जनतेच्या धार्मीक भावनेला उत्तेजना देणे. लोकशाहीत लोकसंख्या अधिक असलेल्या पक्षाला विजय होता. शासन त्या पक्षाचे बनते.

**निष्कर्ष :—१)** भारतीय लोकशाही समोर धर्म हि एक मोठी समस्या बनु नये या साठी धर्माला राजकारणा पासुण दुर ठेवने गरजेचे आहे.

२) संविधानाच्या अंतर्गत राहून राष्ट्रीय एकात्मतेला महत्व दिल्या जावे. धर्माचा उपयोग राष्ट्रीय आणि एकात्मता वाढविण्यासाठीझाला पाहिजे.

३) धार्मीक मुलतत्व वादातून देशातील जनते मध्ये वैमनस्याची—शत्रुत्वाची भावना वाढु नये या साठी धार्मीक सहाकार्य — समन्वयावर भरदेण्याची गरज आहे.

शासनकर्ते हे धर्मनिरपेक्ष भुमिकेतुन विधायक वर्तण भारतीय लोकशाही यशस्वीसाठी आवश्यक आहे. धर्मनिरपेक्ष समाज निर्माण झाल्याशिवाय हि लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही हे एतिहासिक सत्य आहे.

**संदर्भ ग्रंथसुची:—**

१. **भारतीय विज्ञान कोष खंड तिसरा प्र. ५८**
२. **डायमंड सामाजिक विज्ञान कोष खंड तिन प्र. २१४५**
३. **देवळानकर शैलेंद्र— समकालिन जागातिक राजकारण प्र. १४०**
४. **किर्ती मिलींद — दहशतवाद— न्यंयॉर्क ते खैरलांजी** सुगावा प्रकाशन पुणे २००८प्र.४४
५. **मोरे विठ्ठल— विचार मंथन— मार्च एप्रील** २००२ प्र. १८
६. **कसबे रावसाहेब— हिन्दु मुस्लीम प्रश्न आणि** सावरकरांचा राष्ट्रवाद सुगावा **प्रकाशन पुणे** १९९४
७. **गडकरी जयंत— हिन्दु मुस्लीम** जमातवादाच्या पंचनामा डि.डि. कोसंबी एज्यु, **इस्ट मुंबई १९९६**
८. **देशपांडे प्रदिप— होय, हे धर्मनिरपेक्ष** लोकशाही राष्ट्र आहे. एकता **सांम्प्रदायिक सौहार्द समिती मुंबई २००४**
९. **यशवंत सुमन (लेख) भारतीय** राष्ट्रवादाची जडण, घडण, स.पा. प्रकाश **बाळा/किहाळ किशोर, आंबेडकर** अकदमी सातारा २००२